क्र. आस्थाप/मावक/कावि/2020/1/9/1333
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
जळगाव, दिनांक: 09 / 06 /2020

प्रति,
उपविभागीय अधिकारी,
जळगाव / फैजपूर / अमळनेर / भुसावळ

विषय :- तलाठी पदभरती प्रक्रिया-2019.
**महापरिक्षा पोर्टलमार्फत घेण्यात आलेल्या ऑनलाईन परिक्षेतील गुणवत्तेच्या आधारे निवड झालेल्या उमेदवारांना पदस्थापना देणेबाबत.**

जिल्हाधिकारी जळगाव यांचे अधिपत्याखालील उपविभागीय अधिकारी यांचे आस्थापनेवरील तलाठी संवर्गातील रिक्त पदे भरणेसाठी महापरिक्षा पोर्टलमार्फत तलाठी महापरिक्षा - 2019 घेण्यात आलेली आहे. सदर परिक्षेतील प्राप्त गुणांच्या आधारे दि.14/01/2020 रोजी जिल्हा निवड समितीने अंतिम निवड यादी प्रसिध्द केलेली आहे. सदर यादीतील उमेदवारांना खाली दर्शविलेप्रमाणे तलाठी पदावर (**वेतनस्तर** S-8 : 25500-81100) त्यांच्या नावासमोर रकाना क्र. 4 मध्ये दर्शविलेल्या उपविभागामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या आधारे नियुक्ती देण्यासाठी संबंधित उपविभागीय अधिकारी यांचेकडेस याद्वारे वाटप करण्यात येत आहे.

उपविभागीय अधिकारी यांनी निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना त्यांचे उपविभागात तलाठी पदावर **रकाना क्र. 3 मधील प्रवर्गामध्ये रिक्त पदावर नियुक्ती द्यावी.** तसेच शासन निर्णय दि. 24/03/2014 नुसार जोपर्यंत पायाभूत प्रशिक्षण पूर्ण करीत नाहीत तोपर्यंत त्यांना पदस्थापना न देता परिविक्षाधीन तलाठी (कर्मचारी) असे मानण्यात यावे. प्रशिक्षण कालावधीत तलाठ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधीत सक्षम अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेनंतरच त्यांना तलाठी पदावर पदस्थापना द्यावी. नियुक्ती दिलेल्या रिक्त सजांचा अतिरिक्त कार्यभार ज्या वरिष्ठ तलाठ्याकडे सोपविण्यात आला आहे. त्या वरिष्ठ तलाठ्याकडे / मंडळ अधिकारी संवर्गातील कर्मचाऱ्याकडे नवनियुक्त तलाठ्यास प्रशिक्षण संलग्न करावे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव व पत्ता | निवडीचा प्रवर्ग | वाटप करण्यात आलेला उपविभाग |
|---|---|---|---|
| 1. | प्रज्ञाराणी अनिल वंजारे<br>प्लॉट नं. 15, आदर्शनगर, मक्रा पार्क, डी मार्ट जवळ जळगाव | अ. जाती<br>खेळाडू | जळगाव |
| 2. | श्याम पंजाबराव तिवाडे<br>साईनाथ ले-आऊट जुना उमरसरा यवतमाळ | खुला<br>खेळाडू | फैजपूर |
| 3. | हमीदखान आबीदखान पठाण<br>मु. पो. हिवरा रोहीला, ता. जि. वाशिम | ई.डब्ल्यु.एस.<br>खेळाडू | अमळनेर |
| 4. | संतोष परशराम गायकवाड<br>मु. पो. पळसखेड दौलत ता. चिखली<br>जि.बुलडाणा 443 201 | इ.मा.व.<br>खेळाडू | भुसावळ |

उपरोक्त उमेदवारांच्या नेमणूकीसाठी नियुक्ती प्राधिकारी या नात्याने आपलेस्तरावरुन आदेशात खाली दर्शविलेल्या अटी व शर्ती नमूद कराव्यात तसेच उपविभागीय अधिकारी यांना त्यांचे स्तरावर इतर काही अटी व शर्ती नमूद करावयाच्या असल्यास त्यादेखील नमूद करण्यात याव्यात.

1. वरील उमेदवारांना दिलेली नेमणुक ही पुर्णत: तात्पुरत्या व अस्थायी स्वरुपाची असून तलाठी पदासाठीची अर्हता तसेच त्यांनी सादर केलेल्या आवश्यक अभिलेखाच्या सत्यतेच्या अधिन राहून निवड करण्यात आलेली आहे. सदर कागदपत्र बनावट, खोटे असल्याचे आढळून आल्यास त्यांचे सेवा पुर्वस सूचना न देता किंवा कोणतेही कारण न दर्शविता समाप्त करण्याचे नियुक्ती प्राधिकाऱ्याचे अधिकार अबाधीत राहतील. तसेच भविष्यात पदे कमी झाल्यास अगर इतर कारणास्तव त्यांची सेवा समाप्त केल्यावर त्यांचा या पदावरील नेमणुकीसंबंधीचा कोणताही हक्क राहणार नाही.
2. समांतर आरक्षणाबाबतचे प्रमाणपत्र भविष्यात बनावट, खोटे किंवा अवैध असल्याचे आढळून आल्यास संबंधीत उमेदवाराची निवड व नेमणूक रद्द करण्यात येईल.
3. उमेदवारांनी या आदेशाचे दिनांकापासून 30 (तीस) दिवसांचे आत नेमणुकीचे पदावर रुजु होणे आवश्यक आहे. जर ते विहित मुदतीत सदर पदावर रुजु झाले नाहीत, तर त्यांची सदर पदावर केलेली निवड व पदस्थापना रद्द झालेचे समजण्यात येईल.
4. नियुक्तीचे कार्यालयात हजर होण्यापूर्वी ते अन्यत्र नोकरी करीत असल्यास त्या पदाचा राजीनामा देणे व सक्षम प्राधिकाऱ्याने राजीनामा स्विकृत केल्याबाबतचे आदेश / पत्र रुजू अहवाला सोबत सादर करणे आवश्यक आहे. सदर आदेश / पत्र सादर केल्याशिवाय सदर पदावर रुजू होता येणार नाही. अशा उमेदवारास रुजु करून घेण्यापूर्वी सर्व आवश्यक कागदपत्र प्राप्त करून घेण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखांची राहील.
5. उमेदवारांस त्यांना नेमणूक दिलेल्या तलाठी पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्यांनी नियुक्ती प्राधिकरणाकडे एक महिन्यांची आगाऊ नोटीस द्यावी अथवा एक महिन्याचे वेतन शासन जमा करावे लागेल.
6. रुजु होतेवेळी भारतीय घटनेतील तरतुदीनुसार भारतीय संघराज्याशी एकनिष्ठ राहण्याबाबत शपथ घ्यावी लागेल. तसेच शासन सेवेत रुजु होतांना शासन निर्णय राजकीय सेवा विभाग क्रमांक 1581/14 दिनांक 9/8/1979 अन्वये विहित केल्यानुसार वचननामा लिहून द्यावा लागेल.
7. एतदर्थ मंडळाची उच्चस्तर हिंदी व मराठी भाषा परीक्षा शासनाने विहित केलेल्या कालावधीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
8. महाराष्ट्र नागरी सेवा नियमावली व शासनाने वेळोवेळी केलेले नियम त्यांना बंधनकारक राहतील. तसेच ते ज्ञात करुन घेण्याचे व अनुपालन करण्याचे उत्तरदायित्व त्यांचेवर बंधनकारक राहील.
9. वरील उमेदवारांची नियुक्ती ही त्यांचे पूर्व चारित्र्य, वर्तणूक व वैद्यकिय पडताळणी अहवालाचे अधिन राहून करण्यात येत आहे. पूर्व चारित्र्य व वर्तणूकीबाबत संबंधित पोलीस अधिक्षक यांचेकडील तसेच वैद्यकिय पडताळणी बाबत जिल्हा शल्य चिकित्सक, यांचेकडून शासकीय नोकरीस पात्र असलेबाबतचे प्रमाणपत्र एक महिन्याचे आत सादर करणे आवश्यक आहे. वरील अहवाल प्रतिकूल आल्यास संबंधित उमेदवारांना सेवेतून कमी करण्यात येईल.
10. संबंधित उमेदवाराच्या पूर्व चारित्र्य, वर्तणूक व वैद्यकिय पडताळणीबाबतचा आवश्यक पत्रव्यवहार त्या-त्या कार्यालय प्रमुखांनी तात्काळ करावा.
11. नेमणुकीच्या ठिकाणी हजर होण्याकरीता पदग्रहण अवधी व प्रवासभत्ता अनुज्ञेय नाही.

12. संबंधित उपविभागीय अधिकारी यांनी सदर उमेदवारास रुजु करुन घेण्यासाठी त्यांचेकडून त्यांची जन्मतारीख, जात प्रवर्ग, शैक्षणिक अर्हता व इतर आवश्यक अर्हतेबाबतची इ. माहिती दर्शविणारी सर्व मुळ कागदपत्रे तपासणी करुन घ्यावीत व तद्नंतरच त्यांना रुजु करुन घेण्यात यावे.

13. शासन निर्णय वित्त विभाग क्र-अंनियो-1005/126/सेवा-4, दि. 31/10/2005 नुसार उमेदवारांना नवीन परीभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (Defined Contribution Pension Scheme) लागु राहील. सदर उमेदवारांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, 1982 व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम, 1984 योजना लागु राहणार नाही. या संदर्भात शासनाचे काही निर्देश अगर सुचना प्राप्त झाल्यास ते सदर उमेदवार यांचेवर बंधनकारक राहतील.

14. रुजु झाल्यानंतर संगणक ज्ञानाबाबतची विहित अर्हता परीक्षा 2 वर्षाचे आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा 2 वर्षाचा कालावधी संपताच संगणक परिक्षा उतीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सादर न केल्यास नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. याबाबत कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

15. तलाठी पदावर रुजु झालेनंतर चार वर्षात व तीन संधीत महसुल विभागाची विभागीय दुय्यम सेवा परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. तद्नंतर सदर परीक्षा उत्तीर्ण होईपावेतो त्यांना वार्षिक वेतनवाढ देय राहणार नाही.

16. रुजु झालेनंतर 15 दिवसाचे आंत विहित रकमेचे प्रतिभुती बंधपत्र करुन देणे बंधनकारक राहील.

17. तलाठी पदावर रुजू झालेनंतर शासन परिपत्रक साप्रवि क्र सीडीआर-1076/2059/293/11 दि. 20/11/1980, शासन निर्णय दिनांक 24/11/1988 व शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. वशिअ-1214/प्र.क्र.26/11, दि. 02/06/2014 मधील तरतुदीनुसार तीन महिन्यांच्या आत मत्ता व दायीत्व (Assets & Liabilities) बाबतचे विवरणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

18. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, 2005 मधील तरतुदीनुसार लहान कुटुंबाबाबतचे प्रतिज्ञापत्र भरुन देणे आवश्यक राहील.

19. शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र/बीसीसी-2011/प्र.क्र.1064/2011/16-ब दि.12/12/2011 मधील तरतुदीनुसार, ज्या उमेदवाराची निवड विशिष्ट मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली आहे, अशा उमेदवारास, त्याच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे.

20. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करून घेणे आवश्यक राहील. त्याने नियुक्ती स्वीकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोचपावतीची साक्षांकित प्रत नियुक्ती प्राधिकाऱ्यास तात्काळ सादर करावी.

21. जात पडताळणी समितीने त्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले, तर त्यास दिलेले नियुक्ती आदेश रद्द करण्यात येतील. आणि संबंधित उमेदवाराविरुध्द महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, 2000 यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

22. खुल्या प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारास त्यांच्या मुळ जातीच्या प्रवर्गाचा फायदा सेवा ज्येष्ठता/पदोन्नतीकरिता घ्यावयाचा असल्यास सदर उमेदवारांनी नियुक्तीपासून 6 महिन्याच्या आत मुळ जातीचे वैधता प्रमाणपत्र संबंधीत उपविभागीय अधिकारी यांचेकडे सादर करणे बंधनकारक राहील. त्यानंतरच त्यांच्या मुळ जातीची नोंद सेवापुस्तकात / ज्येष्ठता यादीत घेण्यात येईल.

23. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. तप्रसि-2012/प्र.क्र.242-अ/ई-10 दि. 24 मार्च, 2014 नुसार नियुक्त तलाठी 6 महिन्याचे प्रशिक्षण घेईल व ते सक्तीचे असेल.

24. जनहित याचिका क्र. 175/2018 व इतर प्रकरणामधील मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे दि.27/06/2019 च्या आदेशाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुमती याचिका क्र. 15737/2019 व इतर याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत. सदर याचिकेत मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.12/07/2019 रोजी दिलेले आदेश विचारात घेता, मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार करण्यात येणाऱ्या नियुक्त्या या मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुमती याचिकामधील निर्णयाच्या अधिन राहुन देण्यात येत आहेत.

25. संबंधित उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयास वाटप करण्यात आलेल्या उमेदवारास आपले उपविभागामध्ये समाविष्ट असलेल्या तालुक्यामधील रिक्त सजेवर नियमानुसार पदस्थापना देणेबाबतची कार्यवाही तात्काळ करावी. आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व नियुक्ती आदेशाची प्रत कार्यालयीन संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकामी तात्काळ या कार्यालयास सादर करावी.

अध्यक्ष, जिल्हा निवड समिती
तथा जिल्हाधिकारी जळगाव

**प्रत:** मा. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई - 32 यांना माहितीस्तव सविनय सादर
**प्रत:** मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर
**प्रत:** संबंधीत उमदेवार श्री / श्रीमती ------------------------------------------------------------------------
यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी रवाना.